# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

इ :मेल-directorcrs78@gmail.com


जा.क्र. मसंकें/विकास/ 119 /२०२६ दि. 29/04 /२०२६

### निविदा सूचना

**विषय: सन 2026-27 मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत प्रक्षेत्रावरील विविध कामे भाडेतत्वावर जेसीबीने करण्याकरिता निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत......**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विविध कामे भाडेतत्वावर जेसीबीने करण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा पत्रक संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी व लिफाफ्यावर "**जे.सी.बी.**" असा उल्लेख करावा.

३. निविदापत्रका मधील दर हे जीएसटी व इतर सर्व करासह नमूद करावे.

४. निविदाधारक/कंत्राटदाराकडे संबंधीत कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. निविदाधारक/कंत्राटदाराला परवाना (RC Book) व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावरील सदर काम करीत असतांना पिकाचे/फळबागेचे किंवा विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रावरील विविध कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

७. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावर देण्यात आलेले सदर काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कवचे देयक काढण्यात येणार नाही.

८. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारककंत्राटदारां/ना बंधनकारक राहील.

९. निविदाधारकाने देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१०. या कार्यालयातर्फे निविदाधारक/कंत्राटदारास सदर काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य/मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही .सदर काम करण्याकरिता आवश्यक साहित्य/मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

११. निविधारकास सदर कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल व संपूर्ण कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.

१२. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावर सदर कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक डॉ. पंदेकृवि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पंदेकृवि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१३. सदर कामाचे दर हे पुरवठा आदेश निर्गमित केल्याचे दिनांकापासून ३१ मार्च २०२७ पर्यत वैध राहतील.

१४. **सदर निविदाधारकाने जेसीबी हा सन २०२१ नंतर खरेदी केलेला असावा**.

१५. सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास व संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असल्याचे रु.१०० चे स्टॅप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित निविदाधारकास बंधनकारक राहील.

१६. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **१२.०५.२०२६** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावीच .

१७. कोटेशन तपशिलासंबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला कार्यालयाशी संपर्क साधावा

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ.वि.कृ.दे.पं ., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील विविध कामे भाडेतत्वावर जेसीबीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | फळ रोप लागवडीकरिता गड्डे करणे, शेत व बांधावरील काटेरी झुडपे काढणे, शेतामधील पाणी काढण्याकरिता नाली खोदणे, शेत तळ्यावरील इनलेट आउटलेट मोकळे करणे व पाईप टाकणे ई. | प्रति/तास | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण:
दिनांक:

**स्वाक्षरी**
नाव व संपूर्ण पत्ता